# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीचे

## कार्यवृत्तांत

वार: गुरुवार, दिनांक: ०६/०२/२०२५, दुपारी ०२.०० वा.

स्थळ : राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीचा कार्यवृत्तांत

### गुरुवार, दि. ०६ फेब्रुवारी, २०२५ रोजी दुपारी ०२.०० वा.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ४७ (२) च्या तरतूदीनुसार परीक्षा व मूल्यमापन मंडळाची बैठक गुरुवार दिनांक ०६/०२/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वा. राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १. | प्रा. प्रकाश महानवार,<br>मा.कुलगुरु, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | अध्यक्ष | उपस्थित |
| २. | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत ब. दामा<br>मा. प्र. कुलगुरु, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | सदस्य | उपस्थित |
| ३. | डॉ. पी. एम. पवार<br>प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,<br>स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनियरींग, पंढरपूर | सदस्य | उपस्थित |
| ४. | डॉ. आर. एस. मेंते<br>प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,<br>संगणकशास्त्र संकुल,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | सदस्य | उपस्थित |
| ५. | डॉ. शिवाजी विश्वास शिंदे<br>प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, डी.ए.व्ही. कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर | सदस्य | उपस्थित |
| ६. | डॉ. वसंत कोरे<br>प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर | सदस्य | उपस्थित |
| ७. | डॉ. आय. जे. तांबोळी<br>प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा, सोलापूर सोशल असोसिएशन आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर | सदस्य | उपस्थित |
| ८. | प्राचार्य, डॉ. राजशेखर एस. हिरेमठ<br>प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा, श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर | सदस्य | उपस्थित |
| ९. | प्राचार्य, डॉ. शशिकांत तांबे<br>प्रभारी सहायोगी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा, बळीरामदादा बनसोडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चळे, ता-पंढरपूर | सदस्य | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | डॉ. गजानन पळसे,<br>शिवाजी विद्यापीठ,<br>कोल्हापूर | सदस्य | अनुपस्थित |
| ११. | डॉ. राजेश राऊत,<br>डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई | सदस्य | उपस्थित |
| १२. | मा. शिक्षण संचालक,<br>उच्च शिक्षण, संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे | सदस्य | अनुपस्थित |
| १३. | डॉ. श्रीकांत ग. अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | सदस्य सचिव | उपस्थित |

**स्वागत:**

संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी मा.अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

डॉ. गजानन पळसे, व मा. शिक्षण संचालक यांच्या अनुपस्थितीची नोंद घेऊन मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| विषय क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | दिनांक ०६ डिसेंबर, २०२४ रोजीच्या बैठकीचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे व कार्यवाही अहवालाची नोंद घेणे. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | **दि. ०६/१२/२०२४ रोजीच्या बैठकीतील विषय क्रमांक २ बाबत महाविद्यालयाने विद्यापीठाच्या विरोधात केलेल्या न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने पुनर्विचार करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले व उर्वरित सर्व कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला तसेच ठरावांवर केलेल्या कार्यवाहीची अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.** | |

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळ, पुण्यश्लोक

| विषय क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील एम. म. भूगोल या अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पात्रतेची बाब परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर.**<br>**टिपणी:-** सोबत जोडलेल्या श्रीमती एडके मिनाक्षी महादेव, बार्शी या विद्यार्थीनीचा दि.११/०९/२०२४ रोजीचे एम. एम. भूगोल या विषयाची पात्रता मंजूर करणेबाबत प्राप्त झालेले पत्र अवलोकनार्थ सादर.<br><br>सदर अर्जाअन्वये विद्यार्थीनीने शै. वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी येथे एम.ए. भूगोल या विषयास प्रवेश घेऊन व पात्रता करण्याबाबत कागदपत्रासह महाविद्यालयाने दि.२०२३/शिमबा/७१५ दि.२९/११/२०२३ अन्वये विनंती अर्ज केला होता.<br><br>यानुसारसदर प्रकरणी मा. प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा यांचे दि.०२/०३/२०२४ रोजीच्या प्राप्त अभिप्रायानुसार दि.२६/०३/२०२४ अन्वये टिपणीवरील मान्यतेने संबंधीत महाविद्यालयास जा.क्र.पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२३-२४/४४४४, दि.१५/०६/२०२२ नुसार पात्रता निकर्ष पूर्णकरीत नसल्याने अपात्र असल्याचे कळवून सदर प्रकरणी पात्रता निकष पूर्ण न केल्यामुळे प्रवेश देणारे महाविद्यालय जबाबदार असल्याचे कळविण्यात आलेले आहे.<br><br>तदनंतर सदर विद्यार्थीनीचा दि.११/०९/२०२४ रोजीच्या विद्यापीठास प्राप्त अर्जाअन्वये जा.क्र.प्रअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२४-२५/१४० दि.२२/०१/२०२५ नुसारश्रीमती. एडके मिनाक्षी महादेव ची एम.ए. भूगोल या अभ्यासक्रमास पात्रता निकषानुसार अपात्र झाल्यानेत्यानुसार सदर महाविद्यालयाने काय कार्यवाही केली याबाबत तात्काळ माहिती या कार्यालयाससादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.<br><br>तरी अद्याप पर्यंत सदर महाविद्यालय यांनी श्रीमती एडके मिनाक्षी महादेव ची एम.ए. भूगोल या अभ्यासक्रमास पात्रता निकषानुसार अपात्र झाल्यानेकाय कार्यवाही केली याबाबत माहिती या कार्यालयाससादरकेलेली नाही.<br><br>सबब, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील एम. म. भूगोल या अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पात्रतेची बाब परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर. | पात्रता विभाग |
| ठराव: | **संबंधित विद्यार्थ्याचे महाविद्यालयाकडून प्रथम, द्वितीय व त्रितीय या पदवी वर्षाचे गुणपत्रक मागवून घेण्यात यावे व त्याचे अवलोकन करुन संबंधित विद्यार्थ्याला पात्रतेच्या अनुषंगाने ब्रिझ कोर्स व अन्य पर्यायाबाबत निर्णय घेण्याकरीता सदरचा विषय अभ्यासमंडळे विभागाकडे वर्ग करण्याचे सर्वानुमते ठरले.** | |

परीक्षा व मूल्यमापन मंडळ,

| विषय क्र. | विषय | विभाग |
| --- | --- | --- |
| [०३ ] | **डॉ. गिरीश जाखोटिया यांचा त्यांना D. Lit Degree या मानद पदवीने सन्मानीत करण्याबाबतचा प्रस्ताव परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर.**<br>**टिपणी:-** संदर्भ - १) डॉ. गिरीश जाखोटिया, यांचा प्रस्तुत विद्यापीठास प्राप्त झालेला D.Litt पदवी मिळणेबाबतचा दि. २८ सप्टेंबर, २०२४ रोजीचा विनंती अर्ज (इकडीलकार्यालयास प्राप्त दि. १०/१०/२०२४) (पताका -अ)<br>२) दि. १४/१०/२०२४ रोजीची मान्यता (पताका- ब )<br>३) दि. १९/१२/२०२४ रोजीची मान्यता (पताका- क )<br>उपरोक्त संदर्भिय क्र. १ च्या प्राप्त अर्जान्वये, डॉ.गिरिश जाखोटिया यांनी वेगवेगळया क्षेत्रामध्ये केलेल्या उल्लेखनिय कामाची माहिती अर्जासोबत जोडली असूनसदरील माहितीची दखल घेऊन आपल्या विद्यापीठाकडून D. Lit Degree देणेबाबत विनंती अर्ज केला असूनमहाराष्ट्र शासन सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ कलम १२९ मधील १ व २ नूसार कार्यवाही करणे आवश्यक असल्याने डॉ.गिरिश जाखोटिया यांना D.Lit Degree देणेबाबतचा प्रस्ताव मा.कुलपती कार्यालयाकडे पत्राद्वारे पाठविण्याची बाब आदेशार्थ सादर केली असता सदरील विषय अधिष्ठाता मंडळ, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यास मान्यता देण्यात आली असून त्याची प्रत सोबत जोडली आहे.<br>सन्मान्य पदवी प्रदान करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे तरतूद नमूद केली आहे.<br>**१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२९ :**<br>१) कोणत्याही व्यक्तीस, कोणतीही चाचणी परीक्षा किंवा परीक्षा किंवा मूल्यमापन परीक्षा देण्यास भाग न पाडता, केवळ तिचे श्रेष्ठ स्थान, नैपुण्य व सार्वजनिक सेवा यामुळे सन्मान्य पदवी किंवा विद्याविषयक इतर विशेषोपाधी मिळण्यासती पात्र व योग्य आहे, केवळ याच कारणांवरुन त्या व्यक्तीला अशी सन्मान्य पदवी किंवा विद्याविषयक इतर विशेषोपाधी प्रदान करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेला विचार करता येईल व अधिसभेला शिफारसकरता येईल, आणि अशा शिफारशीला, अधिसभेच्या सभेला हजर असणाऱ्या सदस्यांच्या दोनतृतीयांशापेक्षाकमी नसेल इतक्या, एकूणसदस्यसंख्येच्या निम्म्यापेक्षाकमी नसतील इतक्या सदस्यांच्या बहुमताने पुष्टी मिळालीतर, ती शिफारस यथोचितरीत्या संमत करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल :<br>: परंतू, कुलगुरूनेकुलपतीची पूर्वमान्यता मिळवलेली असल्याखेरीज, व्यवस्थापन परिषद, त्यासंबंधीचा कोणताही प्रस्ताव विचारार्थ स्वीकारणार नाहींकिंचा विचारात घेणार नाही.<br>२) व्यवस्थापन परिषदेस, अधिसभेचे या प्रस्तावावर निर्णय घेता येईल, मात्र, कुलगुरुने कुलपतीची पूर्वमान्यता मिळवलेली असल्याखेरीज अधिसभा त्यासंबंधीचा कोणताही प्रस्ताव विचारार्थ स्वीकारणार नाही किंवा विचारात घेणार नाही.<br>**२) २०१८ चा एकरुप परिनियम क्रमांक ३ :**<br>**२. सन्मान पदव्या आणि विद्याविषयक विशेषोपाधी** - १) विद्यापीठ दर वर्षी विज्ञान, तंत्रज्ञ ाान, समाजशास्त्र, विधि भौतिक विज्ञान, कला, साहित्य, इ. क्षेत्रांमधील जास्तीत जास्त दोन सन्मान्य पदव्या किंवा विद्याविषयक विशेषोपाधी प्रदानकरता येतील.<br>२) सन्मान्य पदव्या किंवा विद्याविषयक विशेषोपाधी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभामध्ये प्रदानकरण्यात येतील.<br>**३. सन्मान्य पदव्या किंवा विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्यासाठीची कार्यपध्दती :**<br>१. कुलगुरु, स्वत:च्या शिफारशीसह, सन्मान्य पदवी किंवा विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्यासंदर्भातील नामनिर्देशनेकुलपतींकडे पाठवू शकतील. | दिक्षांत विभाग |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ★ परीक्षा व मूल्यमापन मंडळ

| | |
|---|---|
| | २. कुलपतीकडून शिफारस प्राप्त झालेली नामनिर्देशने, कुलगुरु, सन्मान्य पदवी किंवा विद्याविषयक विशेषोपाधी प्रदानाच्या कारणासाठी व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवतील.<br>३. व्यवस्थापन परिषदेस, सन्मान्य पदवी किंवा विशेषोपाधी प्राप्त करण्याकरिता योग्य व उचित व्यक्ती आहे, केवळ याच आधारे, तिचीकोणतीही चाचणी किंवा परीक्षा किंवा तिचे मूल्यमापन न करता, सन्मान्य पदवी किंवा विद्याविषयक विशेषोपाधी प्रदानकरण्यासाठी, अधिसभेकडे शिफारसकरता येईल.<br>४. कुलगुरुने कुलपतीची पूर्वमान्यता घेतल्याशिवाय, व्यवस्थापन परिषद आणि अधिसभा सन्मान्य पदवी किंवा विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव स्वीकारणार नाही किंवा विचारात घेणार नाही.<br>५. अधिसभेच्या एकूणसदस्यसंख्येच्या निम्म्यापेक्षाकमी नसलेल्या, तिच्या बैठकीमध्ये उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी दोनतृतीयांश पेक्षाकमी नसतील इतक्या सदस्यांनी सन्मान्य पदवी किंवा विद्याविषयक विशेषोपाधी प्रदानकरण्यासाठी बहुमताने पाठिंबा दर्शविला असेलतर, व्यवस्थापन परिषदेची शिफारस, अधिसभेकडून यथोचितरीत्या मंजूरकरण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.<br>६. सन्मान्य पदवी किंवा विद्याविषयक विशेषोपाधी म्हणजे शैक्षणिक अर्हता असल्याचे मानण्यात येणार नाही.<br><br>सबब, डॉ. गिरीश जाखोटिया, यांचा त्यांना D. Lit Degree या मानद पदवीने सन्मानित करण्याबाबतचा प्रस्ताव परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर. |
| **ठराव:** | **नोंद घेण्यात आली.** |

| विषय क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| [०४] | **ऑक्टोबर/नोव्हेंबर -2024 परीक्षेच्या बी. फार्मसी सत्र 5 फार्माकॉलोजी II (801503) या विषयाच्या प्रश्नपत्रिकेमध्ये अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्नाचे गुण अधिष्ठाता यांनी दिलेला अभिप्रायपरीक्षा व मूल्यमापन मंडळास विचारार्थ सादर.**<br>**टिपणी :-**<br>1) कॉलेज ऑफ फार्मसी, सोलापूर या महाविद्यालयाचे दि.०७/०१/२०२५ रोजीचे ई-मेलवर प्राप्त पत्र.<br>2) कॉलेज फार्मसी, पंढरपूर या महाविद्यालयाचे दि.०८/०१/२०२५ रोजीचे ई-मेलवर प्राप्त पत्र.<br>3) औषधनिर्माणशास्त्र विभागाचा दि.१३/०१/२०२५ व १७/०१/२०२५ रोजीचा ई-मेल.<br>4) श्री. शिंगे जे. एस., कॉलेज ऑफ फार्मसी सोलापूर यांचा अभिप्राय दि.१७/०१/२०२५ रोजी ई-मेलवर प्राप्त.<br>5) शिक्षणशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखा विभागाची दि.१८/०१/२०२५ रोजीची टिपणी<br>6) औषधनिर्माणशास्त्र विभागाचा दि.१८/०१/२०२५, २३/०१/२०२५ व २४/०१/२०२५ रोजीचा ई-मेल.<br>7) औषधनिर्माणशास्त्र (बी.फार्मसी) BOS या अभ्यासक्रमाचे चेअरमन, प्रा.एम.एस. कलशेट्टी यांचादि.२४/०१/२०२५ रोजीचा अभिप्राय ईमेलवर प्राप्त.<br>उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठ औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमातील बी.फार्मसी सत्र ५ फार्माकॉलोजी II (८०१५०३) या विषयाची परीक्षा दिनांक ०७/०१/२०२५ रोजी घेण्यात आली असून या विषयातील प्रश्नपत्रिकेमध्ये (प्रश्न क्रमांक १ मध्ये MCQ No. २, ३, ४, १०, १५) व (प्रश्न क्रमांक २ मध्ये Short Answer Question No. B. F) आणि (प्रश्न क्रमांक ३ मध्ये Long Answer Question No. C) या प्रश्नामध्ये त्रुटी असल्याबाबत संदर्भ क्र. १ व २ अन्वये दि.०७/०१/२०२५ आणि दि.०८/०१/२०२५ रोजीच्या ई-मेलव्दारे प्रस्तुत विद्यापीठास महाविद्यालयाने कळविण्यात आले आहे.<br>याअनुषंगाने श्री. शिंगे जे. एस., सदर विषयाचे पेपर सेटर यांना संदर्भ क्र. ३ अन्वये आपला अभिप्राय देणेबाबत दि. १३/०८/२०२५ व १७/०८/२०२५ रोजी ई-मेलव्दारे कळविण्यात आले होते. त्यानुसार संदर्भ क्र. ४ अन्वये त्यांचा अभिप्राय दिनांक- १७/०१/२०२५ रोजी ई-मेलद्वारे प्रस्तूत विद्यापीठास प्राप्त झाला आहे. अभिप्राय खालीलप्रमाणे.<br>**पेपरसेटरचा अभिप्राय -**<br>With reference to the e mail received from your office on 13th January, 2025 at 11:02 am (Section Officer pharma 'sopharm@sus.ac.in'), please note that I was appointed as paper setter and Chairman for theory exam in the subject of Pharmacology-II at Third year B. Pharmacy, Sem V (w.e.f. July2019)and Ms. S. H. Kharat was the co-setter for the subject. We submitted three (03) sets of question papers with model answers and scheme of marking according to the old syllabus i.e. CBCS Syllabus because in the question paper format sent by your office it was mentioned as syllabus w.e.f. 2017-18 and the Third year B. Pharmacy as per new PCI syllabus was expected to have exam in 2019-20. The question papers of old syllabus was printed and issued for the current Oct/Nov-2024 examination.<br>In the question paper published and issued for subject Pharmacology II (801503) at B. Pharmacy (Sem V), (CBCS), Examination Oct./Nov. 2024, out of three sets, In Set II Q.No.3 is part of unit IV (Sub-unit 5e.) of the syllabus and it its not out of the syllabus. Q.No.2(B) is a part of unit III (Sub-unit 3c.) of the syllabus, Q.No.2(F) is a part of Unit II (Sub-unit 1b.) of the syllabus. Q.No.1 MCQ 2 is part of Unit II 1b , MCQ 3 is part of Unit IIIe , MCQ 4 is a part of Unit IIb , MCQ 10 is part of Unit II 1a and MCQ 15 is a part of Unit I 1e of the syllabus.<br>In this regard kindly note that the questions set by us in the question papers were as per old syllabus and that part of old syllabus is also there in the new syllabus. Kindly accept my apology for any mistake in the question paper. (सोबत अभिप्राय जोडला आहे.) | परीक्षा कालीन |

संदर्भ क्रमांक ५ अन्वये मा. अध्यक्ष फार्मसी अभ्यासमंडळ अध्यक्ष यांचा अभिप्राय घ्यावा असे सुचित केलेप्रमाणे. संदर्भ क्रमांक ६ नुसार दि. १८/०१/२०२५, २३/०१/२०२५ व २४/०१/२०२५ रोजीच्या ई-मेलद्वारे संबंधित चेअरमनला कळविले होते.

त्यानुसार संदर्भ क्रमांक ७ अन्वये प्रा. एम. एस. कलशेट्टी, औषधनिर्माणशास्त्र (बी.फार्मसी) BOS या अभ्यासक्रमाचे चेअरमन यांचा अभिप्राय प्राप्त झालेला आहे. अभिप्राय खालीलप्रमाणे.

**चेअरमनचा अभिप्राय -**

With reference to your email dated January 23, 2025 It is observed that the questions Q1 MCQ 2, 3, 4 & 15, Q2 B, Q2 F & Q3 C of the above subject are not included in the syllabus of Pharmacology-II as per PCI syllabus 2017-18.

Therefore these questions can be considered as out of syllabus and benefit can be given to the students who have attempted these questions as there were other questions for options.

Secondly I think the question paper has been set referring to the syllabus of CBCS pattern 2016-17 instead of PCI pattern 2017-18. Hence any other sets of these paper setters be verified before using for next examination.

**अधिष्ठाता यांचा अभिप्राय -**

Based on the opinion of the BoS Chairman.

Q1--> all the students are given 5 marks ensuring that max marks will not exceed. Dont Check those out of Syllabus Questions

Q2--> Even though 2 sub questions were out of syllabus, Students had the opportunity to solve 5 questions out of 7 questions, So NO EXTRA Marks should be given.

Q3. Take best of A and B marks and Add 10 Marks Extra for all the students. Dont Check those out of Syllabus Questions

Also, send this case to lapses for further processing.

ऑक्टोबर/नोव्हेंबर -2024 परीक्षेच्या बी. फार्मसी सत्र 5 फार्माकॉलोजी II (801503) या विषयाच्या प्रश्नपत्रिकेमध्ये अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्नाचे गुण अधिष्ठाता यांनी दिलेल्या अभिप्राय प्रमाणे देणेबाबतची बाब विचारार्थ सादर.

ठराव: **ऑक्टोबर/नोव्हेंबर -2024 परीक्षेच्या बी. फार्मसी सत्र 5 फार्माकॉलोजी II (801503) या विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील चुकीबाबत अधिष्ठाता यांनी दिलेला अभिप्राय स्विकारुन अभिप्रायाप्रमाणे सर्व संबंधित विद्यार्थ्यांना 15 गुण देण्यात यावे व सदरचे प्रकरण हे परीक्षा प्रमाद समितीकडे वर्ग करण्याचे सर्वानुमते ठरले.**

| विषय क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| [०५] | **महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अकलूज या महाविद्यालयातील शै. वर्ष 2017 मध्ये प्रवेशित विद्यार्थी कु. थोरात राजश्री संजय बी.एड सत्र - 4 (Viva-Voce) व Lesson Examination Practical Submissions (CA) या विद्यार्थीनीच्या ऑक्टोबर 2023 च्या परीक्षेमधील निकालास उशीर झाल्याची व निकामध्ये दुरुस्ती करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 मधीलकलम 48(2) मधीलतरतुदीनुसारमा.कुलगुरु महोदयांनी मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव विचारार्थ.**<br>**टिपणी :-**<br>१. महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय,अकलूज या महाविद्यालयाचे दिनांक-३०/०३/२०२४रोजीचे पत्र.<br>२. कु. थोरात राजश्री संजय या विद्याथीनीचे दिनांक-२०/०५/२०२४ रोजी विनंत अर्ज.<br>३. प्रस्तुत विद्यापीठाचे उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय,पंढरपूर या महाविद्यालयास दिनांक-२६/०९/२०२४ पत्र.<br>४. उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय,पंढरपूर या महाविद्यालयाचे विद्यापीठास दिनांक-३०/०९/२०२४ रोजी प्राप्त<br>५. महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय,अकलूज या महाविद्यालयास दिनांक-०५/१०/२०२४ रोजी ई-मेलवरुनकळविण्यात आले.<br>६. महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय,अकलूज यांचे दिनांक-०५/१०/२०२४ रोजी ई-मेलवरुन व दि.१४/११/२०२४ रोजी विद्यापीठास हार्डकॉपीजमा केले आहे.<br>७. मा.कुलगुरु महोदयांना दिनांक-०५/१०/२०२४ रोजीसादर टिपणी.<br>८. मा.संचालक,परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी दिनांक-०६/१२/२०२४ रोजी शेरा दिला नुसार.<br>९. मा.प्राचार्य,महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय,अकलूज या महाविद्यालयाकडून अभिप्राय घेण्याबाबत दि.०७/१२/२०२४ रोजी ई-मेलवरुन पत्र.<br>१०. मा.प्राचार्य,उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय,पंढरपूर या महाविद्यालयाकडून अभिप्राय घेण्याबाबत दि.०७/१२/२०२४ रोजी ई-मेलवरुन पत्र.<br>११. मा.कुलगुरु महोदयांना दिनांक-१०/१२/२०२४ रोजीसादर टिपणी.<br>१२. दि. ३१/१२/२०२४ रोजीचासंगणककेंद्र, परीक्षा व मूल्यमापन विभाग यांची अं.का.टिपणी.<br><br>उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय,अकलूज या महाविद्यालयात शै.वर्ष-२०१७ मध्येकु.थोरात राजश्री संजय (PRN-२०१७०३२५००३०३४३४) यांनीबी.एड साठी आमच्या महाविद्यालयात प्रवेश घेतलाहोता विद्याथीनीच्या वैयक्तिक कारणास्तव सदरील विद्यार्थीनी पदवीसाठी आवश्यक कालावधीमध्ये अभ्यासक्रम पूर्ण करु शकली नाही. विद्यापीठाने N+२ संदर्भातीत नियमित परीपत्रकाप्रमाणेसदरील विद्यार्थीनीने ऑक्टोबर-२०२३ मध्येबी.एड सत्र-४ (Viva-Voce) ची परीक्षा दिनांक-१६/१२/२०२३ रोजी उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पंढरपूर येथील परीक्षा केंद्रावर दिली आहे. (Viva-Voce) चे मार्क महाविद्यालयाच्या login मधून Online भरणे आवश्यकहोते. परंतूepavesh login मध्ये Blank Marksheet List उपलब्ध नसल्याच्या कारणास्तव ते मार्क भरण्यात आले नाहीततरी login उपलब्ध करुन देण्यात यावे असे महाविद्यालयाने विद्यापीठास विनंती केली आहे.<br>**संदर्भ क्रमांक-२** नुसारकु.थोरात राजश्री संजय या विद्यार्थीनीने दिनांक-२०/०५/२०२४ रोजीच्या विनंती अर्जाद्वारे बी.एड चेमार्कलिस्ट मिळणेबाबत. विनंती केली आहे.<br>**संदर्भ क्रमांक-३ व ४** नुसारदिनांक-२६/०९/२०२४ रोजीउमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय,पंढरपूर येथे परीक्षा घेण्यात आलेल्या अंतर्गत परीक्षक वबही:थ यांनी (Viva-Voce) ची परीक्षा घेतलेलेगुण मिळण्याबाबत महाविद्यालयास कळविण्यात आलेहोते. त्यानुसार संबधीत महाविद्यालयाकडून दिनांक-३०/०९/२०२४ रोजीच्या पत्रासोबत (Viva-Voce)परीक्षेचेगुण बंद लिफाफा मध्ये विद्यापीठास प्राप्त झाले आहेत.सोबत जोडले आहे. | परीक्षा कालीन |

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

**संदर्भ क्रमांक-५** नुसार महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय,अकलूज या महाविद्यालयाकडून दिनांक-०५/०१०/२०२४ रोजी ई-मेलवरुन पत्रासोबत बी.एड सत्र-४ मधील वार्षिक पाठ (Lesson Examination Practical Submissions) (CA) चेगुण विद्यापीठास प्राप्त झालेले आहेत. सोबत जोडले आहे. त्यास अनुसरुन सादरकरण्यात येते की,ऑक्टोबर-२०२३ मध्ये घेण्यात आलेल्या कु.थोरात राजश्री संजय या विद्यार्थीनीने उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय,पंढरपूर येथील परीक्षा केंद्रावर बी.एड सत्र-४ (Viva-Voce) व वार्षिक पाठ ची परीक्षा दिली असूनतसेच विद्यार्थीनीचे विद्यापीठाच्या Blank Marksheet List मध्येतीचे नांव नव्हते तरी पण विद्यार्थीनीची (Viva-Voce)परीक्षा घेण्यात आलीहोती. सदर विद्यार्थीनीचे गुणहे विद्यापीठ वेबसाईटवर ऑनलाईन मार्क भरण्यासाठी विद्यार्थीनीचे नांव उपलब्ध नसल्यानेसदरचेगुण ऑफलाईन देण्यात येत आहे असे संबधीत महाविद्यालयाने पत्रामध्ये नमूदकेले आहे. तसेच दोन वर्ष अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना N+२ साठी दिनांक-०४/०९/२०२३ च्या विद्यापीठ परीपत्रक क्र-५२ परीपत्रकान्वये संधी देण्यात आलीहोती. त्यानुसारसदर विद्यार्थीनीने सत्र-४ मधील अनुउत्तीर्ण असलेल्या ज्या विषयांची परीक्षा दिली आहेत त्या विषयाचे संबंधीत महाविद्यालयाकडून खालीलप्रमाणेगुण प्राप्त झाल्यानुसार गुणांची संगणक प्रणाली मध्ये नोंदी घेवून निकाल जाहीर करणे आवश्यक आहे.

**संदर्भ क्रमांक-६** संगणक विभागाने सदरचा निकाल जाहीरकेला नाही याबाबत दि.०५/१०/२०२४ रोजीची मा.कुलगुरु महोदयांच्या मान्यताटिपणीनुसारसंगणक विभागाकडून दंडात्मक कार्यवाही करुन या विभागास कळवावे असे दि.०४/११/२०२४ रोजीच्या अकाटिद्वारेसंगणक विभागास कळविण्यात अले आहे. त्यानुसारसंगणक विभागाने दि.०६/१२/२०२४ रोजीच्या टिपणीन्वये अहवाल सादरकेलेले आहे.सोबत जोडला आहे.

**संदर्भ क्रमांक-८ नुसार** मा.प्राचार्य, महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय,अकलूज या महाविद्यालयाकडून अभिप्राय घेण्याबाबत दि.०७/१२/२०२४ रोजी ई-मेलवरुन कळविण्यात आलेहोते, त्यास अनुसरुन महाविद्यालयाने दिनांक-१०/१२/२०२४ रोजी ई-मेलवरुन विद्यापीठासअभिप्राय झाला असून अभिप्राय पुढील प्रमाणे- **कु.थोरात राजश्री संजय या विद्यार्थीनीचा प्रवेश शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये झाला होता या दोन वर्षाच्या शैक्षणिक कालावधीमध्येसदरील विद्यार्थीनीने बी.एड अभ्यासक्रम व प्रात्यिक्षिककार्य पूर्णकेले नव्हते त्यामुळेसदरीलसदरील कालावधीमध्ये पाठ परीक्षेचेगुण दिले गेले नव्हते परंतू विद्यापीठाने N+२ च्या सुविधेमूळे संबधित विद्यार्थीनीनी पुनश्च परीक्षा फार्म भरला व प्रात्यक्षिक पूर्णकेले अंतर्गत गुण भरण्यासाठी Blank Mark sheet संबंधित login मधून उपलब्ध झाले नाहीत्यमूळेत्यांचेगुण विद्यार्थ्याला सादरकेले गेले नाहीत. त्या कालावधीमध्ये विद्यापीठातील संबंधित विभागाला वारंवार फोनकेलेतरीही Blank Mark sheet उपलब्ध झाले नाहीत्यामूळेहेगुण विद्यापीठाला कोणत्या आराखडयामध्येसादर करावयाचे हे माहीत नसल्यामूळे या विद्यार्थीनीचे गुण विद्यापीठाला त्यावेळेस सादर करु शकलो नाही.तरी माहीतीचा स्विकार व्हावा अशी महाविद्यालयाने अभिप्रायात कळविले आहे सोबत अभिप्राय जोडला आहे.**

**संदर्भ क्रमांक-९ नुसार** मा.प्राचार्य, उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय,पंढरपूर या या महाविद्यालयाकडून अभिप्राय घेण्याबाबत दि.०७/१२/२०२४ रोजी ई-मेलवरुन कळविण्यात आलेहोत त्यास अनुसरुन महाविद्यालयाने दिनांक-१०/१२/२०२४ रोजी ई-मेलवरुन विद्यापीठास अभिप्राय प्राप्त झाला असून अभिप्राय पुढील प्रमाणे- **कु.थोरात राजश्री संजय या विद्यार्थीनीची विद्यापीठाकडून ऑनलाईन जनरेट झालेल्या रिकाम्या गुणपत्रिकातसदर विद्यार्थीनीचे नांव उपलब्ध नव्हते तसे आम्ही फोनद्वारे संबंधी विभागास कळविले असता सदर विद्यार्थीनीची तोंडी परीक्षा घ्यावी असे सूचविले परंतू मार्क भरण्यासाठी विद्यापीठाची लिंक मध्येसदर विद्यार्थीचे नांव उपलब्ध झाले नाही त्या नंतर पुढीलकोणतीहीसूचना मिळाली नसल्याने मार्क भरु शकलो नाही. तरी आपण या विषयी मार्गदर्शन करावे अशी महाविद्यालयाने विनंती केली आहे. सोबत जोडला आहे.**

**संदर्भ क्रमांक -१२ नुसार** मा. कुलगुरू महोदय यांच्या दि. १०/१२/२०२४ रोजीच्या मान्य टिपणीनुसारसंगणककेंद्र यांनीदि. ३१/१२/२०२४ रोजी Viva-Voce व Lesson Examination Practical Submissions या विषयाचे गुण देवून गुणपत्रक जनरेटकेले असलेबाबत अहवाल सादरकेलेला आहे. सोबत जोडलेला आहे. त्यास अनुसरुनसंगणक विभागाकडून व

वरीलमहाविद्यालयाकडून सदरचे अहवाल संबंधीत विभागास प्राप्त झाले आहेत.तसेच विद्यार्थी हित लक्षात घेता महाविद्यालाकडून सदर विद्यार्थीनीचे प्राप्त झालेलेगुणांची नोंदखालीलप्रमाणेघेण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | विद्यार्थीनींचे नाव | PRN No./Seat No. | अभ्यासक्रमाचे नांव/सत्र/विषयाचे नांव | महाविद्यालयाकडून प्राप्त झालेलेगुण |
|---|---|---|---|---|
| १ | कु. थोरात राजश्री संजय | २०१७०३२५००३०३४३४ | बी.एड सत्र-४ (Viva Voce) | ५० पैकी २६ |
| २ | | | बी.एड सत्र-४ Lesson Examination Practical Submissions (CA ) | १०० पैकी ५६ |

तरी याबाबत परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत सदरचा विषय निकालामध्ये दुरूस्तीकरण्यास परीक्षा व मुल्यमापन मंडळ या प्राधिकरणाच्या वतीनेमहाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधीलकलम ४८(२) मधीलतरतुदीनुसार मा.कुलगुरु महोदयांनी मान्यता दिल्याची बाब व महाविद्यालयाकडून निकालास उशीर झाल्याचे प्रथम दर्शनी महाविद्यालयाची चूक दिसून येते.

सबब, महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अकलूज या महाविद्यालयातील शै. वर्ष 2017 मध्ये प्रवेशित विद्यार्थी कु. थोरात राजश्री संजय बी.एड सत्र - 4 (Viva-Voce) व Lesson Examination Practical Submissions (CA) या विद्यार्थीनीच्या ऑक्टोबर 2023 च्या परीक्षेमधील निकालास उशीर झाल्याची व निकामध्ये दुरुस्ती करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 मधीलकलम 48(2) मधीलतरतुदीनुसारमा.कुलगुरु महोदयांनी मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव विचारार्थ.

**ठराव:** **नोंद घेण्यात आली.**

| विषय क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| [०६] | **श्री. अभिषेक सलगर, डी.जी.बी. दयानंद विधी महाविद्यालयातील बी.ए.एल.एलएलबी. भाग ५ मधील शै.वर्ष २०२४-२५ मधील कॅरीऑन मधून प्रवेशित विद्यार्थ्याचे दि.१३/०१/२०२४ रोजीच्या समस्याबाबतचा मेल परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर.**<br>**टिपणी:-** श्री. अभिषेक सलगर,डी.जी.बी. दयानंद विधी महाविद्यालयामध्ये पाचव्या वर्षाचे प्रवेशीत विद्यार्थी आहे. सदर प्रवेश २०२४-२५ च्या B.A.LL.B च्या पाचव्या वर्षात घेतला होता. सदरील वर्षाची परीक्षा दि. ०२/०१/२०२५ पासून चालू होणार आहेत आणि आज दि.०१/०१/२०२५ रोजी सकाळी ९:३० ते १०:०० चे सुमारास दयानंद महाविद्यालयातून तुमचे पाचवे वर्षाचे प्रवेश सोलापूर विद्यापीठाने रदद् केले आहे. तुम्हास पाचव्या वर्षाचे कोणतेही परीक्षा देता येणार नाही असे सांगण्यात आले आहे. असे झाल्यास आम्हा विद्यार्थ्याचे शैक्षणिक मानसिक, आर्थिक व शाररिक नुकसान होणार आहे. सर्व विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान झाल्यास त्यास महाविद्यालयास जबाबदार असेल व आम्ही मानसिक त्रासला कंटाळून आम्ही महाविद्यालयाच्या आवारात आत्महत्या करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही असे कळविले आहे.<br>त्याअनुषंगाने प्रस्तुत परीक्षा व मूल्यमापन मंडळामधील विधी विभागाने श्री. अभिषेक सलगर, या विद्यार्थ्याने विद्यापीठास दि.१३/०१/२०२५ रोजीच्या ई-मेलवर संबंधीत डी.जी.बी. दयानंद विधी महाविद्यालयाकडून वस्तुनिष्ठ अहवाल विद्यापीठास सादर करावा असे कळविण्यात आले होते.<br>त्यानुसार महाविद्यालयातील बी.ए. एलएलबीच्या विद्यार्थ्यांना सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये आपल्या परीपत्रक जा.क्र.पुअहोसोविसो/अमंवि/२०२४/५४८५ दि.०१/०८/२०२४ अन्वये बी.ए.एलएल.बी. भाग ५ ला प्रवेश देण्यात आले. प्रवेश देण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात आल्यानंतर दि.१७/०८/२०२४ रोजी महाविद्यालयाने सदर परिपत्रकाप्रमाणे प्रवेशित विद्यार्थाचे प्रवेश बाबतीत मार्गदर्शन मागविले आहे, परंतु या बाबत आपणाकडून अद्यापपर्यंत मार्गदर्शन मिळाले नाही. या महाविद्यालयाने विद्यार्थ्याचे हित व आपल्या परिपत्रकाप्रमाणेच सदर विद्यार्थ्यांना कॅरीऑन अंतर्गत प्रवेश दिलेले आहेत. या सर्व विद्यार्थ्याचे प्रवेश पात्र झालेले आहेत. सदर विद्यार्थ्यांच्या बाबतीत काय कार्यवाही करावी या बाबतीत आपणास वेळोवेळी पत्रव्यवहार तसेच फोन करुन व व्हॉटसअॅप वर चर्चा केलेली आहे. प्रत्येक वेळेस आज होईल उद्या जनरेट होईल असे तोंडी उत्तर मिळाले आहे. दिनांक ३०/१२/२०२४ रोजीच्या परीक्षा विभागामध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. तेव्हा सदर विद्यार्थ्याचे शै.वर्ष २०२४-२५ मधील बी.ए.एलएल.बी.भाग ५ मधील प्रवेश रदद् करुन सेमीस्टरा ९ ची परीक्षा विद्यार्थ्यांना देऊ नका असे सांगा म्हणून सांगण्यात आले आहे. तद्नंतर सदर विद्यार्थ्याचे सेमीस्टर ९ ची जनरेट झालेली हॉलतिकीट रदद् करुन उर्वरित सेमीस्टरची नवीन हॉलतिकीट आपल्या विभागाकडून देण्यात आलेले आहे असे कळविले आहे.<br>सबब, श्री. अभिषेक सलगर, डी. जी. बी. दयानंद विधी महाविद्यालयातील बी.ए.एल.एल.एल.बी. भाग ५ मधील शै.वर्ष २०२४-२५ मधील कॅरीऑन मधून प्रवेशित विद्यार्थ्याचे दि.१३/०१/२०२४ रोजीच्या समस्याबाबतचा मेल परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर. | परीक्षा कालीन |
| ठराव: | **उपरोक्तप्रमाणे ज्या ज्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत परिस्थिती असेल अशा सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार पदवी पूर्ण करण्याकरीता जास्तीत जास्त पाच (५) संधी त्या त्या वेळी प्रसिध्द होणाऱ्या विद्यापीठ वेळापत्रकात कोणताही बदल न करता अनुतिर्ण विषयाबाबत ओव्हरलॅपींगची सदर विद्यार्थ्यांनी काळजी घेऊन परीक्षा देण्याबाबतची शिफारस सर्वानुमते विद्या परिषदेकडे करण्यात आली.** | |

| विषय क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| [०७] | **आक्टों/नोव्हेंबर २०२४ च्या बी.ए.एल.एल.बी. भाग ४ अभ्यासक्रमाच्या परीक्षेमधील दि.०७/०१/२०२५ रोजी आयोजित बी.ए.एल.एल.बी. भाग ४ Labour and Industrial Law २ (१९६०५७०३) SLR-NA-३० या विषयाच्या प्रश्नपत्रिके मधील प्रश्न क्र.१ मधील ३ आणि ९ प्रश्न आणि प्रश्न क्र.४ मधील ६ प्रश्न असे एकूण १७ गुणाचे प्रश्न हे अभ्यासक्रमाबाहेरचे आल्याबाबतचीतक्रारची बाब परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर.**<br>**टिपणी:-** आक्टों/नोव्हेंबर २०२४ च्या बी.ए.एल.एल.बी. भाग ४ अभ्यासक्रमाच्या परीक्षेमधील दि.०७/०१/२०२५ रोजी आयोजित बी.ए.एल.एल.बी. भाग ४ Labour and Industrial Law २ (१९६०५७०३) SLR-NA-३० या विषयाच्या प्रश्नपत्रिके मधील प्रश्न क्र.१ मधील ३ आणि ९ प्रश्न आणि प्रश्न क्र.४ मधील ६ प्रश्न असे एकूण १७ गुणाचे प्रश्न हे अभ्यासक्रमाबाहेरचे आल्याबाबतची तक्रार प्राप्त झालेली आहे. त्याअनुषंगाने संबंधीत विषयाच्या पेपरसेंटर, चेअरमन व अधिष्ठाता, विधी विद्याशाखा अभ्यासमंडळ यांचा अभिप्राय खालीलप्रमाणे प्राप्त झालेला आहे.<br>➢ **पेपरसेटर श्री. एस. डी. कासार यांचा Labour and Industrial Law २ या विषयाबाबतचा अभिप्राय:** For Question .१ (३) & (९)<br>Question are According to syllabus only as Maharashtra Recognition of Trade Unions and Prevention of Unfair Labour Practices Act, १९७१ itself contains the provision Which States definition of " trade union" as per the Trade Union act १९२६.<br>And for Question ४ b<br>This Question is OPTIONAL Question as there is OR Question given in the paper that is Question ४.a. Thus students need to answer only one from Q.४ a OR Q.४ b<br>**डॉ. एस. जे. गायकवाड, चेअरमन, विधी विद्याशाखा अभ्यासमंडळ यांचा अभिप्राय :-**<br>The above Question<br>Q १) Multiple Choice Questions<br>Q ) ३, Q ) ९<br>Are out of Syllabus<br>Note : ( These Question are from First year Syllabus Labour and Industrial Law २)<br>Q. ४) Answer the any one of the following question<br>Q) betine Frade union. Explain the procedure for registration of trade union, What are the various immunities that are available to registered trade union under trade union Acl-१९२०७<br>This question also be the out of syllabus.<br>Note (Thise question are from first year Labour & Industrial Law –I)<br>➢ **डॉ. वसंत कोरे, विधी अधिष्ठाता मंडळ यांचा ई-मेल द्वारे प्राप्त अभिप्राय :**<br>**Please consider I the BOS chairman opinion regarding this out of syllabus case.** | परीक्षा कालीन |

| | | |
|---|---|---|
| | सबब, आक्टों/नोव्हेंबर २०२४ च्या बी.ए.एल.एल.बी. भाग ४ अभ्यासक्रमाच्या परीक्षेमधील दि.०७/०१/२०२५ रोजी आयोजित बी.ए.एल.एल.बी. भाग ४ Labour and Industrial Law २ (१९६०५७०३) SLR-NA-३० या विषयाच्या प्रश्नपत्रिके मधील प्रश्न क्र.१ मधील ३ आणि ९ प्रश्न आणि प्रश्न क्र.४ मधील ६ प्रश्न असे एकूण १७ गुणाचे प्रश्न हे अभ्यासक्रमाबाहेरचे आल्याबाबतचीतक्रारची बाब परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर. | |
| ठराव: | **आक्टों/नोव्हेंबर २०२४ च्या बी.ए.एल.एल.बी. भाग ४ अभ्यासक्रमाच्या परीक्षेमधील दि.०७/०१/२०२५ रोजी आयोजित बी.ए.एल.एल.बी. भाग ४ Labour and Industrial Law २ (१९६०५७०३) SLR-NA-३० या विषयाच्या प्रश्नपत्रिकेमधील चुकीच्या अनुषंगाने प्रश्न क्र.१ मधील ३ आणि ९ प्रश्न आणि प्रश्न क्र.४ मधील ६ प्रश्न असे एकूण १७ गुण सर्व संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात यावे व सदर प्रकरण परीक्षा प्रमाद समितीकडे वर्ग करण्याचे सर्वानुमते ठरले.** | |

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ★ परीक्षा व मूल्यमापन मंडळ,

| विषय क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
